**नि.फौ.ख.क्र. १८७/२०२४**

**सरकार –वि– संदिप केदार**

**निशाणी क्र. १९**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची शपथेवर जबानी.**

नांव – सोनाली बापू करचे

वय – २६

धंदा – शेतमजूरी

राहणार – खडकओझर, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. पोलिसांनी माझा दि.२८.०७.२०२४ रोजी वडाळी भोई पोलीस चौकीला जबाब घेतला होता. दि.२२.०३.२०२४ रोजी मी द्राक्ष पॅकिंगसाठी साकोरे येथे गेले होते. तेव्हा माझी आई घरी एकटीच होती. आरोपी हा माझ्या आईच्या भाचा आहे. दि.२२.०३.२०२४ रोजी दुपारी १२ः३० च्या दरम्यान तो माझ्या घरी आला होता व तो माझ्या आईचे दागिने गहाण ठेवण्यासाठी मागत होता. आरोपी माझ्या आईला म्हणाला की, आत्या तुझे दागिने माझा ट्रॅक्टरचा हप्ता भरण्यासाठी दे. तेव्हा माझी आई त्याला म्हणाली की, मी सोनालीला विचारते. तिने संमती दिली तर मी तुला दागिने देते.

२. संध्याकाळी मी घरी आल्यावर आईने मला त्याबाबत विचारले. मी आईला आरोपीला दागिने देऊ नको असे सांगितले. त्यामुळे माझ्या आईने आरोपीला दागिने द्यायला नकार दिला. दि.२७.०३.२०२४ रोजी सकाळी ११ः०० च्या दरम्यान माझी आई गावामध्ये दळण दळण्यासाठी गेली असता माझ्या आईकडून घराचा दरवाजा घाईगडबडीत उघडा राहिला. आईने येऊन घरात पाहिले असता तिला पाठीमागच्या खोलीतील पत्र्याची कोठी उघडी दिसली. त्यामुळे माझ्या आईला संशय आला व तिने कोठी तपासली असता त्याच्यामधील दागिने चोरीला गेले होते. मी संध्याकाळी घरी आल्यानंतर आईने मला त्याबाबत सांगितले. त्यामुळे आम्ही पो.स्टेशनला जाऊन फिर्याद दिली.

३. आरोपीचे आमच्या घरी नेहमी येणे–जाणे होते. त्यामुळे आमचे दागिने त्यानेच चोरले असा आमचा संशय आहे. त्यामुळे माझ्या आईने त्याच्याविरुद्ध फिर्याद दिली होती व पोलिसांनी माझा जबाब नोंदवलेला होता. ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले व ८.८४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडेट व पोत असे आमचे दागिने चोरीला गेलेले होते. ते दागिने आमचे असल्याबाबत खरेदी केल्याच्या पावत्या मी पोलीसांना दिल्या होत्या. ती मुळ पावती मला आता दाखवण्यात आली. त्यापैकी सोन्याचे पेंडेट आम्ही अशोक ज्वेलर्स वडाळी भोई येथून घेतले होते. त्या पावतीला **निशाणी २०** देण्यात येते. मी आरोपीला ओळखते. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. व्ही. एस. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

४. माझे शिक्षण पदवी पर्यंत झालेले आहे. पोलिसांना जबाब देतांना दागिने खरेदी केल्याच्या पावत्या माझ्या नावे आहेत असे सांगितले होते व तसे पोलिसांनी माझ्या जबाबात नमुद केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरामधून जेव्हा तथाकथित दागिन्यांची चोरी झाली. तेव्हा मी माझ्या घरामध्ये नव्हते.

५. वडाळी भोई येथील दुकानातून मी सोन्याचे दागिने कोणत्या तारखेला घेतले ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे आरोपीसोबत संबंध चांगले नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या बांधावरुन आरोपी व माझ्या आईमध्ये वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी २० कडील पावतीवर सोनाराची सही व शिक्का नाही. तसेच घेणाऱ्याची देखील सही नाही. अशोक ज्वेलर्सच्या प्रोप्रायटरचे पूर्ण नाव मला सांगता येणार नाही.

६. माझ्या आईने पो.स्टेशनला दि.३०.०३.२०२४ रोजी फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देण्यासाठी माझ्या आईसोबत मी देखील पो.स्टेशनला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्यानुसार फिर्याद नोंदवली. हे म्हणणे खरे नाही की, मला आजच्या तारखेचे न्यायालयाचे समन्स आले नाही. माझ्या आईने जी फिर्याद दिलेली होती. ती टंकलिखित होती. हे म्हणणे खरे नाही की, दुसरी जी पावती आहे.

त्यातील दागिने माझे किंवा माझ्या आईचे नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देतेवेळी मी ती दुसरी पावती तयार करुन घेऊन गेले. मी जेव्हा सदर सोन्याचे दागिने घेतले तेव्हा सोन्याचा दर प्रति ग्रॅम र.रु. २५००/– असा होता.

७. हे म्हणणे खरे आहे की, साधारणतः जेव्हा कोणीही घराच्या बाहेर दूर जाते तेव्हा घराला कुलूप लावून जातात. मी जेव्हा घरी आले तेव्हा आमच्या घराचा कडी–कोयंडा व्यवस्थित होता. हे म्हणणे खरे नाही की, घरातील पत्र्याच्या कोठीची कडी देखील व्यवस्थित होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझा जबाब नोंदवल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या आईकडे त्याचे कर्ज फेडण्यासाठी दागिने मागत होता हे देखील मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई दळण दळायला गावामध्ये गेली होती व तेव्हा घराचा दरवाजा उघडा असल्याचे मी खोटे कथन केले आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरातील पत्र्याच्या कोठीतील दागिने जेव्हा गहाळ झाले तेव्हा मी घरी हजर नसल्यामुळे ते कसे व कोणी गहाळ केले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने व मी आरोपीविरुद्ध रागाच्या भरात फिर्याद तसेच जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या आईचे पूर्वीपासून जमिनीवरुन वाद असल्यामुळे आम्ही आरोपीविरुद्ध खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.27 17:35:59 +0530

**दि. २७.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**